स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

मानव्यविद्या शाखेतील मराठी विषयाच्या विद्यावाचस्पती पदवीसाठी

करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

संत तुकारामांचे अभंग व चरित्राची डॉ.आ.ह साळुंखे यांनी केलेली मांडणी आणि त्यावरील वाद - विवाद : एक चिकित्सा

संशोधक

इंगोले गजानन व्यंकटी

मार्गदर्शक

प्रा. डॉ.मा.मा.जाधव

हु.बहिर्जी स्मारक महाविद्यालय वसमत

प्रस्तावना

महाराष्ट्राला भक्ती संप्रदायाची मोठी परंपरा लाभली आहे.नाथ,महानुभाव, वारकरी हे त्यातील प्रमुख संप्रदाय म्हणून ओळखले जातात. या संप्रदायांचा महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक,धार्मिक जीवनावर प्रभाव पडलेला आढळतो. म्हणूनच भक्ती चळवळीचे आणि इथल्या सर्वसामान्य माणसाचे नाते हे मायलेकरासारखे आहे.धार्मिक सामाजिक हक्क अधिकारापासून वंचित असलेल्या समाजाला या भक्ती चळवळींनी आपलेसे केले. महात्मा चक्रधरांनी महानुभव संप्रदायाची स्थापना करून समतेची शिकवण देत स्त्रियांनाही आपल्या चळवळीत महत्त्वाचे स्थान दिले. बाराव्या शतकानंतर वारकरी चळवळीचा उदय झाला. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर यासह इतर संतांनी या चळवळीचे नेतृत्व केले.

वारकरी चळवळ ही बाराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते आजच्या एकविसाव्या शतकापर्यंत टिकून राहिली.याचे कारण म्हणजे या चळवळीतील संतांनी मांडलेले तत्वज्ञान होय. संत नामदेवांनी पहिल्यांदा अभंगाची निर्मिती करून वारकरी संप्रदायात किर्तन परंपरा सुरू केली.संत ज्ञानेश्वर, संत गोरोबाकाका, संत नरहरी सोनार,संत सावता अशा संतांनी या चळवळीला बळ दिले. पुढच्या काळात संत एकनाथ यांनी संताने संप्रदायाचे कार्य केले.सतराव्या शतकात संत तुकाराम वारकरी चळवळीचा कळस झाले.

संत तुकाराम म्हणजे केवळ वारकरी संप्रदायापुरता मर्यादित संत नव्हे तर महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक धार्मिक समाज जीवनाचा महान तत्ववेता होय. आपल्या शब्दसामर्थ्याच्या जोरावर समाज बदलाचा ध्यास वाळवून प्रत्यक्ष कृतीत उतरवणारा महान समाज सुधारक म्हणजे संत तुकाराम. संत तुकारामांच्या कार्याचा गौरव करताना महात्मा फुले त्यांना शेतकऱ्यांचा महासाधू म्हणतात. सर्वसामान्य माणसाला समजेल अशा

साध्या सरळ सोप्या भाषेत अभंग रचना केली. म्हणूनच आजही गाव खेड्यात संत तुकारामांचे अभंग तोंडपाठ असणारी लोक आढळतात. संत तुकारामांनी निर्माण केलेले अभंग हे मराठी साहित्याचे भूषणच नव्हे तर प्राण आहे. म्हणूनच डॉ. सदानंद मोरे संत तुकारामांना महाराष्ट्राचा संस्कृती पुरुष मानतात.देवदेवता, अनिष्ट रूढी, परंपरा वृत्तवैकल्य यामध्ये अडकलेल्या बहुजन समाजाला बाहेर काढण्यासाठी संत तुकारामांनी अभंगाची रचना केली. वाईट चालीरीती रूढी परंपरेवर अभंगरुपी अटकरे ओढले. स्त्री-पुरुष, जात-पात, श्रेष्ठ-कनिष्ठ असा कोणताही भेदभाव न पाळता सर्व समाजाला वारकरी या एका छताखाली आणण्याचे कार्य संत तुकारामांनी केले. विठ्ठल भक्तीचे महत्त्व सांगून अनेक देव-देवता भक्तीला कठोर शब्दात विरोध केला.तुकारामांनी मांडलेला विचार नेहमीच समाजाला दिशा देणारा ठरत आला आहे.

संत तुकारामांच्या साहित्याचा अभ्यास आज पर्यंत अनेक साहित्यिक अभ्यासकांनी केलेला आढळतो. संत तुकारामांचे चरित्र १७७४ मध्ये काव्यमय स्वरूपात महिपतीने लिहिले. तर पहिले गद्य स्वरूपात १८९६ मध्ये कृष्णाजी अर्जुनराव केळुसकर गुरुजींनी चरित्र लिहिले, ते 'तुकाराम बुवांचे चरित्र' म्हणून प्रसिद्ध आहे. संत तुकारामांच्या पूर्वजांच्या इतिहासापासून ते त्यांच्या निर्वानापर्यंतचा इतिहास या चरित्र ग्रंथाच्या १६ प्रकरणांमधून मांडला आहे.चमत्कार नाकारून सत्याची कास धरणारे संत तुकाराम त्यांनी रेखाटले. अशाच पद्धतीचे चरित्र पां बा कवडे यांनी लिहिले. सत्यशोधक ह.ना नवलकर यांनी १९२९ मध्ये 'सत्यशोधक महासाधू श्रीतुकाराम महाराज' हा ग्रंथ लिहून तुकारामांना सत्यशोधक म्हटले.इतिहास संशोधक वा.सी.बेंद्रे यांनी १९६३ साली 'संत तुकाराम' हा संत तुकारामांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारा ग्रंथ लिहून महिपती सारख्या लेखकांनी दंतकथा आणि चमत्कारकथा कशा घुसडल्या याची

चिकित्सक मांडणी केली.तर दुसऱ्या बाजूला संत तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाला कमीपणा येईल अशी मांडणी वि.ल.भावे, ल.रा. पांगारकर, शं.दा. पेंडसे या चरित्रकारांनी केली. वि.ल.भावे यांनी तर तुकाराम आणि रामदास यांची तुलना करून संत तुकारामांना दैववादी,अडाणी, टाळकुट्या म्हणून निंदा केली. शं दा पेंडसेंनी तुकोबा साक्षात्कारी आणि चमत्कार करणारे होते असे म्हटले. विष्णुशास्त्री चिपळूणकर याच्याही पुढे जाऊन शूद्र कवी म्हणून तुकारामांचा तिरस्कार करतात. अलीकडच्या काळात वि.भि.कोलते,सुदाम सावरकर,डॉ. भालचंद्र नेमाडे,दि.पु चित्रे, डॉ. सदानंद मोरे ,डॉ. किशोर सानप या अभ्यासकांनी संत तुकारामांच्या साहित्याचा आणि चरित्राचा अभ्यास करून महत्वपूर्ण अशी मांडणी केलेली दिसते. तरी या सर्वांपेक्षा वेगळ्या स्वरूपाची मांडणी डॉ.आ.ह. साळुंखे यांनी आपल्या साहित्यातून केली आहे.१९९७ ला त्यांचा विद्रोही तुकाराम हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथातून संत तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंची मांडणी त्यांनी केली.सर्वात महत्त्वाचे म्हणजे संत तुकारामांना त्यांनी विद्रोही तुकाराम असे संबोधले.ग्रंथातील संत तुकारामांचे उभे केलेले लढवये चरित्र ,संत तुकारामांनी प्रस्थापित व्यवस्थेची केलेले बंड यामुळे हा ग्रंथ चर्चेचा आणि वादाचा विषय ठरला.सर्वप्रथम डॉ.सदानंद मोरे यांनी महाराष्ट्र टाइम्स च्या पुरवणीत २८ फेब्रुवारी १९९९ च्या अंकात 'विद्रोही तुकारामच्या खुणाचे मिथक' हा लेख लिहून वादाला सुरुवात केली. त्यानंतर या ग्रंथावर वा.ना.उत्पात डॉ. श्रीपाल सबनीस ,वसंत पळशीकर यांच्यासह इतरही अभ्यासकांनी या वादात उडी घेतली.तर दि.पु. चित्रे यांनी विद्रोही तुकाराम वाचू नका असे आवाहनच वाचकांना केले. डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनीही 'वारकऱ्यांशी शत्रुत्व कशासाठी' असा लेख लिहून डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या भूमिकेला विरोध केला.असे वाद-विवाद असले तरी डॉ.आ. ह साळुंखे यांनी आपली भूमिका सोडली नाही. विद्रोही तुकाराम या ग्रंथानंतर तुकारामाचा

शेतकरी, तुकारामांचे अभंगशतक, तथागत बुद्‌ध आणि संत तुकाराम, संत तुकारामांचे निवडक अभंग, न सरे ऐसे दान तुकोबांचे, हे ग्रंथ लिहून संत तुकारामांच्या अभंगाची आणि चरित्राची सखोल मांडणी केली आहे. त्यांच्या या मांडणीचा व त्यावरील वाद- विवाद यांचा सविस्तर अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

अभ्यास विषयाची निवड

ग्रामीण भागात राहत असल्यामुळे वारकरी चळवळी विषयी नेहमीच आस्था राहिली आहे.गावात अखंड हरिनाम सप्ताह होत असतो.सप्ताहात रोज संध्याकाळी कीर्तन असते. अशी कीर्तने दरवर्षी ऐकण्यात येत असतात बहुतांश कीर्तनकार आपल्या कीर्तनासाठी संत तुकारामांचा अभंग घेतो आणि त्यावर आपली निरूपण करतो.अनेक कीर्तनकार तुकारामांचा अभंगाचे दाखले देत आपले विचार मांडत असतात. त्यामुळे संत तुकारामांच्या जीवन कार्याविषयी जाणून घेण्याची आवड निर्माण झाली. त्यामुळे संत तुकारामांची काही चरित्रे वाचली पण डॉ. साळुंखे यांनी संत तुकारामांचे उभे केलेले व्यक्तिमत्व इतर चरित्रकारांच्या मांडणी पेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असल्याचे दिसले . त्यांनी केलेली ही मांडणी संत तुकारामांच्या विचाराला न्याय देणारे वाटली म्हणून संशोधनासाठी या विषयाची निवड करण्यात आली.

अभ्यास विषयाचा हेतू.

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील हेतू ठेवण्यात आले आहेत.

१) संत तुकाराम यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे.

२) संत तुकारामांच्या चरित्राचा अभ्यास करणे.

३) डॉ.आ.ह .साळुंखे यांनी संत तुकारामांच्या अभंगाची केलेली मांडणी अभ्यासणे.

४) डॉ. आ.ह. साळुंखे यांनी संत तुकारामांच्या चरित्राची केलेली मांडणी अभ्यासणे.

५) डॉ. आ.ह.साळुंखे यांनी केलेल्या मांडणीवरून झालेल्या वाद-विवादांचा चिकित्सक अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके.

१) संत तुकारामांनी सर्वसामान्य माणसाच्या हक्क अधिकारासाठी प्रस्थापित व्यवस्थेशी लढा उभारला.

२) संत तुकारामांनी स्वातंत्र्य ,समता या मूल्यांवर आधारित असे तत्त्वज्ञान मांडले.

३) डॉ.आ.ह.साळुंखे यांनी संत तुकारामांच्या चरित्राची केलेली मांडणी त्यांच्या व्यक्तिमत्वाशी सुसंगत वाटते.

४) डॉ. आ.ह.साळुंखे यांनी संत तुकारामांच्या अभंगाचे सखोल वस्तुनिष्ठ असे विवेचन केले आहे.

५) डॉ.आ.ह. साळुंखे यांच्या मांडणीवर घेण्यात आलेले आक्षेप वस्तुस्थितीला धरून वाटत नाहीत.

अभ्यास विषयाचे महत्त्व.

मराठी साहित्यामध्ये वारकरी संप्रदाय आणि या संप्रदायातील संत यांच्या जीवन कार्यावर मोठ्या प्रमाणात लेखन झालेले आढळते. त्यातही संत तुकाराम यांच्या साहित्याची आणि चरित्राचे चर्चा साहित्य विश्वात सर्वात जास्त झालेली आहे संत तुकारामांनी शोषित पीडित कष्टकरी समाजाच्या कल्याणासाठी जो लढा उभारला त्या लढ्याचे चित्रण डॉ. आ.ह साळुंखे यांच्या साहित्यकृतीमध्ये दिसून येते. बहुजन समाजात सामाजिक, धार्मिक सुधारणा करणाऱ्या तुकारामांचे व्यक्तिमत्व समजून घेणे हे अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. आज पर्यंत तुकारामांच्या चरित्रावर जी मांडणी झाली आहे. त्यामध्ये काही अपवाद वगळता बहुतांश

लेखकांनी उभे केलेले संत तुकारामांचे व्यक्तिमत्व त्यांच्या मूळ व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत वाटत नाही. डॉ.साळुंखे यांनी केलेली मांडणी संत तुकारामांच्या व्यक्तिमत्वाला शोभणारी आहे त्यामुळेच त्यांनी केलेल्या मांडणीचा व त्या मांडणीवरील आक्षेपांचा अभ्यास होणे महत्त्वाचे वाटते.

संशोधनाची मर्यादा.

संत तुकाराम यांच्या साहित्यावर आणि चरित्रावर मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात लेखन झालेले आहे. अनेक अभ्यासकांनी संत तुकारामांच्या कवितेचा आणि जीवन कार्याचा आढावा घेतलेला दिसून येतो. परंतु प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती डॉ.आ.ह. साळुंखे यांनी आपल्या साहित्यातून जी मांडणी केलेली आहे ती मांडणी आणि त्या मांडणीवरील आक्षेप अशी आहे . या विषयापुरताच अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे. हीच संशोधनाची मर्यादा ठरवण्यात आली आहे.

निवडलेली संशोधन पद्धती.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, चरित्रात्मक, समीक्षात्मक, अशा संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

प्रकरणांची रूपरेषा

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी पुढील प्रमाणे प्रकरणांची रूपरेषा ठरवली आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधनासाठी निवडलेल्या अभ्यास विषयाचे महत्त्व, पूर्व संशोधन आढावा, संशोधन विषयाचा हेतू. निवडलेली संशोधन पद्धती,

संशोधनासाठी वापरण्यात येणारी साधनसामग्री. याविषयी सविस्तर मांडणी करण्यात येईल.

प्रकरण दुसरे

वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य.

या प्रकरणामध्ये भारतातील भक्ती संप्रदायाचे महत्त्व आणि त्याचा असलेला समाज मनावरील प्रभाव याची चर्चा करून, वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य यांचा सविस्तर आढावा घेतला जाईल.

प्रकरण तिसरे

संत तुकारामांचे चरित्र व अभंग रचना.

या प्रकरणामध्ये संत तुकारामांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचा प्रवास आणि त्यांनी लिहिलेल्या अभंगाचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे

संत तुकारामांचे चरित्र व साहित्यावर डॉ.आ.ह.साळुंखे यांनी केलेली मांडणी

प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ.आ. ह. साळुंखे यांनी आपल्या ग्रंथांमधून संत तुकारामांच्या चरित्राची आणि साहित्याची जी मांडणी केलेली आहे त्या मांडणीचा अभ्यास या प्रकरणामध्ये केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे

डॉ. आ.ह.साळुंखे यांच्या मांडणीवरील आक्षेपांची चिकित्सा.

या प्रकरणांमध्ये डॉ.आ.ह.साळुंखे यांनी संत तुकारामांचे जे व्यक्तिमत्व उभे केले आहे. त्यावर अनेक अभ्यासकांनी आक्षेप नोंदवला आहे. त्या आक्षेपांची चिकित्सा करून त्यावर संशोधक म्हणून भाष्य केले जाणार आहे.

प्रकरण सहावे

उपसंहार, निष्कर्ष, समारोप.

संशोधनाचे हे शेवटचे प्रकरण संशोधन कार्याचा थोडक्यात सारांश सांगून काही महत्त्वपूर्ण निष्कर्षांची मांडणी करून समारोप करण्यात येईल.

संदर्भसूची.

(अ) : ग्रंथ

१) नेमाडे भालचंद्र : तुकाराम ,साकेत प्रकाशन ,औरंगाबाद द्‌वितीय आवृत्ती २००१

२) मोरे सदानंद : तुकाराम दर्शन, गाज प्रकाशन.अहमदनगर द्‌वितीय आवृत्ती २००१

३) सावरकर सुदाम : वैकुंठ गमन की खून? , मराठी जनसाहित्यपरिषद, अमरावती द्‌वितीय आवृत्ती २००५

४) साळुंखे डॉ.आ.ह. : विद्रोही तुकाराम , लोकायत प्रकाशन ,तृतीय आवृत्ती २०१०

५) नवलकर ह.ना. संपा डॉ. चोपडे अशोक, : सत्यशोधक महासाधू श्रीतुकाराम : जिजाई प्रकाशन पुणे आवृत्ती पहिली २०११

६) सरदार गं.बा. : संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती , लोकवाङ्मयग्रह, मुंबई आठवी आवृत्ती २०१०

७) बेंद्रे वा.सी. : संत तुकाराम, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया दिल्ली, प्रथम आवृत्ती १९६३

८) चित्रे दि.पू. : पुन्हा तुकाराम , एस के वेबलर प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९९०

९) काळे प्र.भा. : नामाचा तुका, जगद्‌गुरु तुकोबाराय साहित्य परिषद उमरखेड ,प्रथम आवृत्ती २००२

१०) मालशे .स ग. : संपा मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा मराठी साहित्य परिषद पुणे , प्रथम आवृत्ती १९८२

११) साळुंखे आ.ह. : तुकारामाचा शेतकरी ,लोकायत प्रकाशन सातारा,

१३) साळुंखे आ.ह. : नसरे ऐसे दान तुकोबाचे, लोकायत प्रकाशन सातारा,

१४) साळुंखे आ.ह. : तुकारामांचे अभंग शतक, लोकायत प्रकाशन सातारा

१५) केळुसकर कृ.अ. : तुकारामबुवांचे चरित्र, साकेत प्रकाशन औरंगाबाद ,प्रथम आवृत्ती २०१५

१६) डॉ. सानप किशोर , : समग्र तुकाराम दर्शन , विजय प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती २००८

१७) कवडे पां.बा. : संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, सनय प्रकाशन नारायणगाव पुणे ,प्रथम आवृत्ती २०२१

१८) नेमाडे भालचंद्र : टीकास्वयंवर साकेत प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९०

१९) देशपांडे अ.ना. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला, व्हीनस प्रकाशन पुणे दुसरी आवृत्ती १९९५

२०) सुंठणकर बा.र. : महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य, पॉपुलर बुक डेपो मुंबई, आवृत्ती दुसरी १९९४

२१) पाटील मुकुंदराव : विठोबाची शिकवण, मराठा संस्कृती साहित्य मंडळ लातूर, प्रथम आवृत्ती २०२०

(ब) नियतकालिके

अनुष्टुभ,नवभारत,कवितारती,साधना,अक्षरगाथा,ललित,चित्रलेखा.

संशोधक	मार्गदर्शक
गजानन व्यंकटी इंगोले.	प्रा.डॉ. मा.मा.जाधव